महाराष्ट्र शासन

27 AUG 1991
39649

क्रमांक : एसएसएन १०९१/२७६४/माशि-१
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय, विस्तार भवन
मुंबई : ४०० ०३२

दिनांक : 24 ऑगस्ट, १९९१

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई/नाशिक/पुणे/कोल्हापूर/
औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

विषय : १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत..

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन, सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून, १९९१ पासून विना अनुदान तत्वावर (इंग्रजी माध्यमाच्या शाळांना कायम विना अनुदान तत्वावर), "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सदर संस्थांना अनुदान संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

अ) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक : एसएसएन १०८८/१६६९-एन/माशि-१, दि.१०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क) सदर संस्थाची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळांत शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (इ.बी.सी.च्या) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्रे संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

पृ...२

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

४. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरीत पाठविण्यात यावी.

[ बी. ए. मोरे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना :-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षणाधिकारी, [माध्यमिक], जिल्हा परिषद,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, यांचे स्वीय सहाय्यक,
पालकमंत्री, [ ] जिल्हा यांचे खाजगी सचिव,
निवड नस्ती.

## जिल्हा-पुणे

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण व तालुका | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १) | पुणे कॅन्टोन्मेट, बोर्ड, पुणे | वानवडी बाजार पुणे | आठवी | मराठी |
| २) | पश्चिम महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट, कोंढवा, | कोंढवा खुर्द, पुणे | आठवी | उर्दू |
| ३) | गेनबा सोपान मोझे पॅरिटेबल ट्रस्ट, पुणे-१ | नागपूर चाळ, येरवडा, | आठवी | मराठी |
| ) | भेकराई माता शिक्षण संस्था, भेकराई नगर | भेकराईनगर (लक्ष्मी कॉलनी) [कन्याशाळा] | आठवी | मराठी |
| ) | राजा श्री.शिवराय प्रतिष्ठान कोथरूड, | रामबाग कॉलनी, कोथरूड, पुणे | आठवी | मराठी |
| ) | ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, कृषि विकास प्रतिष्ठान, शिक्षण | शारदानगर, ता.बारामती | आठवी | मराठी |
| ) | कै.मामासाहेब मोहोळ विकास मंडळ, सदाशिव पेठ, पुणे-३० | खांबोली, ता.मुळशी | आठवी | मराठी |
| ) | [illegible] रयत शिक्षण संस्था, सातारा, | वाघाळे ता.शिरूर | आठवी | मराठी |
|  | भैरवनाथ ग्रामविकास प्रतिष्ठान शेटफळ, हवेली, | शेटफळ, हवेली, ता.इंदापूर, | आठवी | मराठी |
|  | भोडणी शिक्षण प्रसारक मंडळ संस्था, भोडणी, | भोडणी, ता.इंदापूर, | आठवी | मराठी |
|  | जागृती शिक्षण संस्था, वाकी बु. | वाकी बु. ता.खेड | आठवी | मराठी |
|  | ज्ञानदा शिक्षण मंडळ, नारायणगाव | जुन्नर, ता.खेड [कन्याशाळा] | आठवी | मराठी |
|  | ज्ञान प्रबोधिनी, निगडी, पुणे-४४ | साळुंब्रे ता.मावळ | आठवी | मराठी |
|  | भैरवनाथ शिक्षण मंडळ, खुटबाव | रा[illegible]गाव, ता.दौंड | आठवी | मराठी |

| २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|
| १५] कैलास शिक्षण मंडळ, राहू | देवकरवाडी ता. दौंड. | आठवी | मराठी |
| १६] श्री. जैन विद्याप्रसारक मंडळ, चिंचवडगांव, | आकुर्डी [प्र. ] | आठवी | मराठी |
| १७] पुणे जिल्हा शिक्षणमंडळ, पुणे | चंदननगर, पुणे ता हवेली | आठवी | मराठी |
| १८] आंबेगांव तालुका विद्याविकास मंडळ, घोडेगांव. | पिंपळगांव, ता आंबेगाव | आठवी | मराठी |
| १९] हरगुडे ग्रामविकास संस्था, हरगुडे ता पुरंदर | हरगुडे ता पुरंदर | आठवी | मराठी |
| २०] पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळ, वाघापूर | बनपूरी ता पुरंदर | आठवी | मराठी |
| २१] गुंजवणी विभाग विकास महामंडळ हातवे, बु. | हातवे बु. ता. भोर | आठवी | मराठी |
| २२] महात्मा फुले विद्यानिकेतन, ससाणेनगर, हडपसर, | हडपसर ता हवेली | आठवी | मराठी |
| २३] पुणे महानगरपालिका पुणे | शुक्रवार पेठ, पुणे | आठवी | मराठी |
| २४] श्री. छत्रपति शिवाजी संस्था, भवानीनगर, इंदापूर, | पिंपळी ता. इंदापूर | आठवी | मराठी |
| २५] रयत शिक्षण संस्था, सातारा स | अण्णापूर ता शिरूर | आठवी | मराठी |
| २६] पिंपरी बु. पंचक्रोशी प्रतिष्ठान, पिंपरी बु. | पिंपरी बु. ता इंदापूर | आठवी | मराठी |
| २७] नंदीकेश्वर एज्युकेशन सोसायटी, निरगुंडी | निरगुंडी ता. इंदापूर | आठवी | मराठी |
| २८] कै. मामासाहेब मोहोळ विद्याविकास मंडळ, | कुरुळी ता. खेड | आठवी | मराठी |
| २९] रोकडोबा शिक्षण संस्था, ता. खेड | रेटवडी ता खेड | आठवी | मराठी |

....२